टि.१

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.प्रले/एफडीटी/एफआय/१४७ दि.०७.१०.२०२२

विषय : सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजावर महानगरपालिका आयुक्तांचे **निवेदन**

---

महानगरपालिका प्रशासनातर्फे प्रतिवर्षी आगामी वर्षाचे **'अर्थसंकल्पीय अंदाज'** स्थायी समितीस सादर करतेवेळी चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या विविध खात्यांनी केलेल्या उल्लेखनीय / वैशिष्टयपूर्ण कामगिरीबाबत तसेच आगामी वर्षात हाती घ्यावयाचे प्रकल्प / उपक्रम यांच्या रुपरेषेबाबत मान.महानगरपालिका आयुक्त, एका पुस्तिकेच्या (Budget Speech) स्वरुपात थोडक्यात **'निवेदन'** सादर करतात.

२. प्रमुख लेखापाल (वित्त) / प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) यांच्या स्वाक्षरीने महानगरपालिकेच्या खाते प्रमुखांना मार्गदर्शक सूचनेसहीत दरवर्षी परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते. मागील वर्षाचे परिपत्रक पृष्ठ क्र.प-१ ते प-७ येथे अवलोकनार्थ सादर केले आहे.

३. तद्अनुषंगाने प्रमुख लेखापाल (वित्त) / प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करावयाच्या मार्गदर्शक सुचनांचा पृष्ठ क्र.प-३९ ते प-५३ वरील मसुदा आपल्या अवलोकनार्थ व मंजूरीकरीता सविनय सादर.

(पांडुरंग वि. गोसावी)
**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)**

(प्रदिप भा. पडवळ)
**प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.**

(रामदास आव्हाड)
**उप आयुक्त (वित्त)/**
**मान.महोदय,**

**उप आयुक्त (वित्त)**

(पी. वेलरासू)
**अति. महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)**
**मान.महोदय,**

Additional Municipal Commissioner
(Project)

बृहन्मुंबई महानगरपालिका
उप आयुक्त (वित्त) यांचे कार्यालय
महापालिका मुख्यालय, विस्तारित इमारत,
चौथा मजला, महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.

दिनांक 07 OCT 2022

क्रमांक: उप आयुक्त/वित्त/ 963

10/10/2022

बृहन्मुंबई महानगर पालिका
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)
यांचे कार्यालय

10 OCT 2022

क्र. अति.आ./प्रकल्प/ 4680

13-10-2022

CA(F)

बृहन्मुंबई महानगरपालिका
प्रमुख लेखापालांचे कार्यालय

(22)

13 OCT 2022

क्रमांक FDT | 1182

प-३८

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र.प्रले/एफडीटी/११८२ दि.१३.१०.२०२२

**मार्गदर्शक सूचना**

२०२२-२३

विषय : सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजावर महानगरपालिका आयुक्तांचे **निवेदन**

———————————

महानगरपालिका प्रशासनातर्फे प्रतिवर्षी आगामी वर्षाचे '**अर्थसंकल्पीय अंदाज**' स्थायी समितीस सादर करतेवेळी चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या विविध खात्यांनी केलेल्या उल्लेखनीय / वैशिष्टयपूर्ण कामगिरीबाबत तसेच आगामी वर्षात हाती घ्यावयाचे प्रकल्प / उपक्रम यांच्या रुपरेषेबाबत मान.महानगरपालिका आयुक्त, एका पुस्तिकेच्या (Budget Speech) स्वरुपात थोडक्यात '**निवेदन**' सादर करतात.

२. वरील बाब लक्षात घेऊन आगामी आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजावर तयार करावयाच्या महानगरपालिका आयुक्तांच्या निवेदनात अंतर्भूत करण्यासाठी **सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ'** मध्ये नमूद केलेल्या भारतीय राज्य घटनेच्या बाराव्या अनुसूचिनुसार महानगरपालिकेस नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या (अनु क्रमांक १ ते १८) इतर आवश्यक बाबींच्या (अनु क्रमांक १९ ते ४९) अंमलबजावणी संदर्भात महानगरपालिकेच्या विविध खात्यांमार्फत हाती घेण्यात आलेल्या उपक्रमाच्या अनुषंगाने खाते प्रमुखांनी आपल्या खात्याशी संबंधित असलेल्या माहिती संदर्भात संबंधित मान.अतिरिक्त आयुक्त यांच्याशी विचार विनिमय करून अंतिम करण्यात आलेली माहिती **मराठीमध्ये तिच्या इंग्रजी भाषांतरासह** संबंधित उपायुक्त व अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने **दि.१५ नोव्हेंबर, २०२२** पर्यंत प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प विभागाकडे कृपया पाठविण्यात यावी. जेणेकरून सदर माहितीमध्ये वारंवार दुरुस्त्या टाळणे शक्य होईल व कामकाजास विलंब होणार नाही. तसेच खात्यांकडून प्राप्त होणाऱ्या उपरोक्त निवेदनामधील तरतूदी ह्या आयुक्त स्तरावर अंतिम करण्यात आलेल्या तरतूदीनुसार अर्थसंकल्प उपविभागाकडून निवेदनात अंतर्भूत / सुधारण्यात येतील. त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतूदी अंतिम झालेल्या नाहीत म्हणून निवेदन प्रलंबित न ठेवता प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प विभागाकडे पाठविण्यात यावे.

३. सदरची माहिती प्रमुख लेखापाल (वित्त) खात्याच्या अर्थसंकल्प विभागाकडे पाठविताना खालील महत्त्वाच्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रीत करून पाठविणे आवश्यक आहे.

i) सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पावरील निवेदनाकरीता माहिती पाठविताना प्रत्येक खात्यातील सर्व उपविभागांची माहिती प्रत्येक उपविभागांकडून स्वतंत्र्यपणे न पाठविता संबंधित खाते प्रमुखांनी त्यांच्या खात्याची सर्वकष माहिती एकत्रितपणे सादर करणे आवश्यक आहे.

ii) **सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांवरील मान.आयुक्तांच्या निवेदनाची पुस्तिका तसेच मान.अतिरिक्त आयुक्त / उप आयुक्त, खाते प्रमुख, सहाय्यक आयुक्त यांच्या बैठकांमध्ये मान.आयुक्तांनी दिलेले निर्देश व महत्त्वाच्या सूचना संदर्भित करून, त्यामधील आपल्या खात्याशी संबंधित असलेली आश्वासने / उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपाययोजना विषयानुरूप थोडक्यात नमूद कराव्यात. तसेच काही उद्दीष्टे व आश्वासने पूर्ण झाली नसल्यास त्याची समाधानकारक कारणे नमूद करावीत. मागील वर्षाच्या निवेदनातील दिलेल्या आश्वासनांबाबतची अद्ययावत माहिती / सद्यस्थिती निवेदनात नमूद करण्यात यावी.**

iii) अ.क्र. i) मधील बाबींव्यतिरिक्त जर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६१ व ६३ नुसारच्या बंधनकारक व स्वेच्छाधीन कर्तव्ये पार पाडण्यासाठी आपल्या खात्याने सन २०२२-२३ मध्ये काही विशेष कामे पार पाडलेली असतील तर त्याबाबतची माहिती सुध्दा नमूद करण्यात यावी.

iv) तसेच खात्याने सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेले सध्याचे / नवीन उल्लेखनीय प्रकल्प / उपक्रम याबाबतची माहिती अवश्य द्यावी.

v) सदर माहिती संदर्भातील आकडेवारी दर्शविणारे माहितीचे तक्ते, आलेख व छायाचित्रे उपलब्ध असल्यास माहितीसह जोडण्यात यावेत.

vi) शासनाच्यावतीने अथवा शासनाच्या निदेशांनुसार कार्यान्वित केलेली विशेष मोहिम / प्रकल्प राबविला असल्यास त्याबाबतची माहिती सादर करावी.

vii) एखाद्या आपत्कालीन परिस्थितीत आपल्या खात्याने उल्लेखनीय कामगिरी बजाविली असल्यास त्याचा देखील उल्लेख करावा. उदा. मुंबई शहरामध्ये कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना / बजावलेली उल्लेखनीय कामगिरी याबाबतची माहिती नमूद करावी.

viii) महसूलाचे नवनवीन स्त्रोत शोधून त्याद्वारे महसूलात वृध्दी करण्याच्या व विद्यमान महसूली उत्पन्नाच्या स्त्रोताद्वारे अधिकाधिक महसूल कशाप्रकारे मिळवता येईल यासारख्या उपाययोजना करण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी बजावली असल्यास त्याचा देखील उल्लेख करावा.

ix) **सदर माहिती मान.महानगरपालिका आयुक्तांच्या अर्थसंकल्पीय अंदाजावरील निवेदनाचा भाग असल्यामुळे ती थोडक्यात, मुद्देसूद, परिपूर्ण, सुबोध, अचूक असावी. सन २०२३-२४ चे निवेदन तयार करताना मागील वर्षाच्या निवेदनातील माहितीची कोणत्याही प्रकारे पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

x) **असे निदर्शनास आले आहे की, खात्यांकडून प्राप्त होणारे निवेदन ३-४ पानांचे असते व शेवटी आयुक्त स्तरावर निवेदनास अंतिम स्वरुप देताना ते सारांश लेखनाप्रमाणे १-२ पानात बसवावे लागते. त्यामुळे सर्व खात्यांना असे सुचविण्यात येते की, निवेदन सादर करताना ते सारांश लेखनाप्रमाणेच सादर करावे जेणेकरुन वेळेची बचत होईल व निवेदनात कमीतकमी सुधारणा करावी लागेल.**

xi) सदर माहितीची **(मराठी निवेदनाचे पुस्तक AkrutiDevPriya या फॉन्टमध्ये तयार करणे सोयीस्कर असल्यामुळे AkrutiDevPriya या फॉन्टमध्ये आणि इंग्रजी निवेदनाकरीता Times New Roman या फॉन्टमध्ये)** सॉफ्ट कॉपीसुध्दा हार्ड कॉपीसोबत कृपया अर्थसंकल्प उपविभागाकडे सादर करण्यात यावी. तसेच सॉफ्ट कॉपी अर्थसंकल्प उपविभागाच्या ई-मेल आयडी **ao.budget@mcgm.gov.in** वर पाठविण्यात यावी.

xii) आपल्या खात्याची माहिती जरी **'निरंक'** असली तरी तसे या कार्यालयास विहित दिनांकापूर्वी / पर्यंत कळविणे आवश्यक आहे.

04/10/22

**प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.**

3/10/22 03/10/2022

----------------------------------------**(वैयक्तिक)**

## परिशिष्ट 'अ'

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात खालील महत्वाच्या उद्दिष्टांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे:**

**भारतीय राज्य घटनेच्या १२ व्या अनुसुचिमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी**

१. शहर नियोजनासह नागरी नियोजन करणे.

२. इमारतीचे बांधणी भूमीच्या वापराचे विनियमन (Regulation) करणे.

३. आर्थिक आणि सामाजिक विकास नियोजन

४. रस्ते व वाहतूक आणि पूल

५. घरगुती, औद्योगिक आणि व्यापारी प्रयोजनाकरिता पाणी पुरवठा तसेच २४ x ७ पाणी पुरवठा करणे.

६. अ) सार्वजनिक आरोग्य जोपासणे, नागरी स्वच्छतेस प्राधान्य देणे आणि
ब) साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनाबाबत योग्य ती खबरदारी घेणे.

७. अग्निशमन सेवेची दर्जोन्नती करणे.

८. शहर वनशास्त्र, पर्यावरणाचे संरक्षण आणि सजिवसृष्टी शास्त्राचा दृष्टीकोन इत्यादींना प्रोत्साहन देणे.

९. शासन निर्णयानुसार दिव्यांगांसाठी / गतीमंदासाठी अर्थसंकल्पात ५ टक्केची तरतूद करणे.

१०. गलिच्छ वस्ती सुधारणा आणि त्याची दर्जोन्नतीबाबत ठोस उपाययोजना करणे.

११. शहरी गरीब जनतेला पुरवावयाच्या सेवांमध्ये वाढ करणे, शहरातील द्रारिद्रयाचे उपशमन (Poverty Alleviation) करणे व समाजातील दुर्बल वर्गाचे हित संबंध जोपासणे.

१२. जुन्या उद्यानांचा विकास करणे, विकसित उद्यानांची दर्जोन्नती करणे / त्यांची जोपासना करणे, नव्याने विकसित झालेल्या प्रभागात उद्याने उभारणे, वीर जिजामाता भोसले उद्यान प्राणीसंग्रहालयाचे आधुनिकीकरण करणे व खेळाची मैदाने उपलब्ध करून देणे.

१३. बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता / दर्जामध्ये सुधारणा करून, महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याच्या दृष्टीने पाऊले उचलणे. तसेच सांस्कृतिक व सौंदर्य विषयक दृष्टीकोनाचे प्रचालन करणे.

१४. दफन करणे आणि दफन भूमी; प्रेतदहन आणि स्मशानभूमी; आणि विद्युतदाहिनी अशा अत्यावश्यक सेवा पुरविणे.

१५. पशुंवरील क्रुरतेवर प्रतिबंध घालण्याकरिता कोंडवाडयाची सोय करणे.

१६. जन्म, मृत्यू नोंदीसह जीवन विषयक आकडेवारी तयार करणे.

१७. पावसाळयात रस्त्यावर पडणाऱ्या खड्डयांच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी कृती आराखडा तयार करणे. तसेच रस्त्यावरील दिवे, वाहनतळ व स्तंभे आणि लोकांची सोय इत्यादींसह नागरी सुखसोयी करणे.

१८. कत्तलखाने आणि चर्मसंस्करणाचे विनियमन करणे.

**इतर बाबी**

१९. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे / महसुलाचे नवनवीन साधन स्त्रोत शोधणे.

२०. शहरातील गरीब / सामान्य जनतेला तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्राथमिक आरोग्य केंद्राची वाढ करणे. तसेच कर्करोग, हृदय विकार, डायलेसिस, मोठे अपघात इत्यादी खर्चीक ठरणाऱ्या आजारांसाठी उपनगरांत महानगरपालिकेतर्फे अद्ययावत रुग्णालये उभारणे.

२१. विभागीय स्तरावर नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा आणि सुविधांमध्ये सुधारणा करून त्यांचे सुलभीकरण (Simplification) करणे.

२२. महानगरपालिका सेवा सुलभतेने व अधिक जलद गतीने उपलब्ध व्हाव्यात यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करणे / ई-गव्हर्नन्स.

२३. महिला सक्षमीकरण / सबलीकरण यादृष्टीने महिलांना प्रशिक्षण देणे व महिलांवरील वाढत्या अत्याचारांवर प्रतिबंध करण्याकरिता उपाययोजना, महिलांकरिता सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, बेटी बचाव बेटी पढाव उपक्रम.

२४. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा.

२५. प्रशासकीय सुधारणा.

२६. सर्विस लेव्हल बेंचमार्किंग, संगणकीय प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करणे व नियमित Data Entry करणे.

२७. निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतन धारकांना देण्यात येणाऱ्या सोयी.

२८. राज्य शासनाकडून येणे असलेल्या रकमा.

२९. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांचे संरचनात्मक परिरक्षण दुरुस्ती आणि पुनर्बांधणी (Structural Audit).

३०. आपत्कालिन व्यवस्थापन व सुरक्षा.

३१. मालमत्ता कर व शासनाकडून प्राप्त होणारे वस्तू व सेवा कराचे अनुदान.

३२. पर्जन्य जलवाहिन्या.

३३. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता.

३४. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंडया.

३५. ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम.

३६. दिव्यांगांसाठी विविध योजना.

३७. वित्तीय सुधारणा.

३८ बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमास अर्थसहाय्य.

३९. कर्मचाऱ्यांना क्षमता वर्धीकरण प्रशिक्षण.

४०. गटविमा योजना.

४१. डिपार्टमेंट ऑफ बिजनेस डेव्हलपमेंट.

४२. स्वच्छ भारत - स्वच्छ मुंबई अभियान.

४३. पूर्व उपनगरातील इंजिनिअरिंग हब.

४४. म्युझियम व संग्रहालयाबाबत.

४५. एलईडी लाईटस (रस्त्यावरील जुन्या लाईट बदलून एलईडी लाईट लावणे).

४६. इज ऑफ डुईंग बिझनेस (Ease of doing business), इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स (Ease of Living Index).

४७. ग्राहक तक्रार निवारण प्रणाली (CCRS).

४८. कोविड-१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना.

४९. असल्यास, या व्यतिरिक्त इतर महत्त्वाच्या ठळक बाबी.